admn16-17


# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

(महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, १९८३ मधील कलम १२ नुसार स्थापित)

आयएसओ ९००१ : २००८ मानांकित संस्था

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

MCAER कृषि परिषद

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com

वेबसाईट : www.mcaer.org

दूरध्वनी (०२०) २५५३ ७६८८.

फॅक्स (०२०) २५५३ ३७६४.


जा.क्र. मकृप/शिक्षण-१/८१६/१५८७

दि. ९ जुलै,२०१६

## परिपत्रक

**विषयः- कृषी विद्यापीठांतर्गत पदविका अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया पुढे ढकलण्याबाबत.**

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत कृषी तंत्र विद्यालय व कृषी तंत्रनिकेतन हया पदविका अभ्यासक्रमांची सन २०१६-१७ हया शैक्षणिक वर्षातील ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया दि.१०/६/२०१६ पासून सुरु करण्यात आलेली आहे.

तथापि, डॉ. पजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला अंतर्गत कृषी तंत्र निकेतनांचे तपासणीचे कामानिमित्त कुलसचिव, डॉ. पंदेकृवि, अकोला यांच्याकडून कृषी तंत्र निकेतन अभ्यासक्रमाचा प्रवेश कार्यक्रम पुढे ढकलण्याविषयी प्रस्ताव प्राप्त झाला होता. तसेच पावसाळी वातावरणामुळे काही भागात नेटवर्कच्या जोडणीमध्ये अडचणी येऊन उमेदवारांना वेळेत ऑनलाईन प्रवेश अर्ज दाखल करणे शक्य झाले नसल्याच्या तक्रारी दूरध्वनीद्वारे प्राप्त होत आहेत. यामुळे मुदत वाढवून देण्याची मागणी करण्यात येत आहे.

उक्त बाबी विचारात घेता, कृषी पदविका अभ्यासक्रमाचा प्रवेश कार्यक्रम खालीलप्रमाणे पुढे ढकलण्यात येत आहे.

| अ. क्र. | कार्यक्रम | पूर्वीचा दिनांक | सुधारित दिनांक |
|---|---|---|---|
| १. | संपूर्ण भरलेले अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक | २८/०६/२०१६ | ०८/०७/२०१६ |
| २. | तात्पुरती गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | ०५/०७/२०१६ | १५/०७/२०१६ |
| ३. | तक्रार अर्ज स्विकृतीचा अंतिम दिनांक | ११/०७/२०१६ | २१/०७/२०१६ |
| ४. | विद्यापीठस्तरीय तक्रार निवारण समितीची बैठक | १२/०७/२०१६ | २२/०७/२०१६ |
| ५. | अंतिम गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | १६/०७/२०१६ | २६/०७/२०१६ |
| ६. | जिल्हानिहाय व विद्यालयनिहाय गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | १७/०७/२०१६ | २७/०७/२०१६ |
| ७. | पहिल्या प्रवेश फेरीच्या जिल्हानिहाय वाटप यादीची प्रसिध्दी दिनांक | २०/०७/२०१६ | ३०/०७/२०१६ |

admn16-17

| अ. क्र. | कार्यक्रम | पूर्वीचा दिनांक | सुधारित दिनांक |
|---|---|---|---|
| ८. | संबंधित विद्यालयात उपस्थित राहून प्रवेश घेण्याचा अंतिम दिनांक | २२/०७/२०१६ (सायं. ५.३० पर्यंत) | ०१/०८/२०१६ (सायं. ५.३० पर्यंत) |
| ९. | दुसऱ्या प्रवेश फेरीच्या वाटप यादीची प्रसिध्दी (रूपांतरासह) (विद्यापीठनिहाय) | २५/०७/२०१६ | ०४/०८/२०१६ |
| १०. | संबंधित विद्यालयात उपस्थित राहून प्रवेश घेण्याचा अंतिम दिनांक | २७/०७/२०१६ (सायं. ५.३० पर्यंत) | ०६/०८/२०१६ (सायं. ५.३० पर्यंत) |
| ११. | राज्यस्तरीय गुणवत्ता यादीनुसार घटक विद्यालयस्तरावर / विद्यापीठस्तरावर भरावयाच्या रिक्त जागांच्या तपशिलाची संकेतस्थळावर प्रसिध्दी | ३०/०७/२०१६ | ०९/०८/२०१६ |
| १२. | * विद्यापीठस्तरीय जागेवरील प्रवेश फेरी व व्यवस्थापन कोटयातील जागांवर प्रवेश फेरीचा कालावधी | ०१/०८/२०१६ ते ०४/०८/२०१६ | ११/०८/२०१६ ते १४/०८/२०१६ |
| १३. | वर्ग सुरु होण्याचा दिनांक | ०१/०८/२०१६ | १०/०८/२०१६ |

रविवारी तसेच शासकीय सुटीच्या दिवशी प्रवेश फेरीच्या कालावधीत कामकाज चालू राहील.

सर्व संबंधितांनी सदर सुधारीत वेळापत्रकाची नोंद घ्यावी.

महासंचालक

प्रतः-

१. कुलसचिव, महात्मा फुले कृषी विद्यापीठ,राहुरी, जि.अहमदनगर / डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला / वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

२. मे. कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि., शॉप १ व २, राधाकांत को-ऑप हौसिंग सोसायटी, रामबाग कॉलनी, कृष्णा हॉस्पीटलसमोर, पौड रोड, पुणे ४११ ०३८

यांना सूचित करण्यात येते की, वरील सुधारीत प्रवेश कार्यक्रम विचारात घेऊन पुढील कार्यवाही करावी तसेच सदरचे परिपत्रक प्रवेशविषयक संकेतस्थळावर उपलब्ध करून द्यावे.

३. मे. जे. डी. आय. एन. सॉफ्ट, आरएच-७, प्लॉट क्र. ६१, सेक्टर क्र. १६, पीसीएनटीडीए, चिखली, पुणे ४११ ०१९.

यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी सदरचे परिपत्रक कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून द्यावे.